SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE
Official Publication of Sant Gadge Baba Amravati University
PART-TWO

गुरूवार ,दिनांक २ फेब्रुवारी , २०१२

**अधिसुचना**

**क्र. : १६/२०१२** **दिनांक :२/२/२०१२**

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता अधिसुचित करण्यात येते की, वित्त व लेखा समितीने दिनांक ३०.८.२०१० रोजीच्या सभेत विषय क्र. २३ अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेकरीता शिफारस करण्यात आल्यानुसार व महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम १४(७) अंतर्गत मा. कुलगुरू महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने दिनांक १८.१०.२०१० रोजी मान्यता प्रदान केल्यानुसार अनुक्रमे-

१) सत्र २०११-२०१२ पासून विद्यापीठाचे प्रतिनिधित्व आंतर विद्यापीठ स्पर्धेत करणाऱ्या सर्वसंबंधित खेळाडूंना प्रतीदिन रूपये १५०/- प्रमाणे दैनंदिन भत्ता (Daily Allowance) प्रदान करण्यात येईल

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
कुलसचिव

****

**अधिसुचना**

**क्र. :१७/२०१२** **दिनांक:२/२/ २०१२**

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता अधिसुचित करण्यात येते की, वित्त व लेखा समितीने दिनांक ३०.८.२०१० रोजीच्या सभेत विषय क्र. २४ अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेकरीता शिफारस करण्यात आल्यानुसार व महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम १४(७) अंतर्गत मा. कुलगुरू महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने दिनांक १८.१०.२०१० रोजी मान्यता प्रदान केल्यानुसार अनुक्रमे-

१. आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत तसेच आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धेत शैक्षणिक सत्र २०१०-२०११ पासुन नव्याने **शक्तीत्तोलन (महिला) विभागाचा** अंतर्भाव करण्यात येत आहे.

२. हस्तपुस्तिका नियम क्र. २/२००४ व **विद्यापीठ राजपत्र भाग-२** अन्वये **दिनांक ०९ एप्रिल, २००९ रोजी** निर्गमित करण्यात आलेल्या **अधिसुचना क्रमांक ५०/२००९ दिनांक ०३.४.२००९ च्या परिशिष्ट अ,ब** नुसार आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत आंतर गृह खेळ या अंतर्गत प्रदान करण्यात येणाऱ्या खर्चानुसार संबंधित महाविद्यालयास आयोजन खर्च संबंधित महाविद्यालयास प्रदान करण्यात येईल.

३. **शक्तीत्तोलन (महिला)** क्रीडा स्पर्धेचे आयोजनाकरीता विद्यापीठाच्या क्रीडा व सांस्कृतिक क्रीया हस्तपुस्तिका, नियम क्र. २/२००४ मध्ये अंतर्भुत असलेल्या दरात **विद्यापीठ राजपत्र भाग-२** अन्वये **दिनांक ०९ एप्रिल, २००९ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या अधिसुचना क्रमांक ५०/२००९ दिनांक ०३.४.२००९ च्या परिशिष्ट अ,ब** मध्ये नमुद केलेले वाढीव तसेच वेळोवेळी अधिसुचित करण्यात येणारे वाढीव दर अनुज्ञेय राहील.

४. **शक्तीत्तोलन (महिला)** क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंचे प्रवेश शुल्क हे पुरूष खेळाडूंकरिता आकारण्यात आलेल्या शुल्काप्रमाणे विहित कालावधीत सर्वसंबंधीत महाविद्यालयांनी विद्यापीठात धनादेश, धनाकर्ष अथवा रोखीने जमा करणे अनिवार्य राहील.

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
**कुलसचिव**

*********

**अधिसूचना**

**क्रमांक-१८/२०१२** दिनांक- २/२/२०१२

**विषय :- विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये एका संस्थेकडुन दुसऱ्या संस्थेस हस्तांतरीत करावयाचे शुल्काबाबत.**

सर्व संबंधीतांचे माहितीकरीता अधिसूचित करण्यात येते की, व्यवस्थापन परिषदेने दिनांक १३.१०.२०११ च्या सभेत विषय क्र २८४ अन्वये विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये एका संस्थेकडुन दुसऱ्या संस्थेकडे हस्तांतरीत करण्याबाबतचे हस्तांतरण शुल्क रु.१.०० लक्ष निश्चित केले आहे. तथापी असे करीत असतांना मुळ संस्थेने विद्यापीठात जमा केलेला राखिव निधी तसेच इमारत निधी कायम राहील असा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतलेला आहे.

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ